# 'मेट्रो-३'च्या भुयारीकरणाचा चौदावा टप्पा पूर्ण

**खास प्रतिनिधी, मुंबई**

**कुलाबा ते** सिप्झ या 'मेट्रो ३' भुयारी मार्गिकेवरील भुयारीकरणाच्या चौदाव्या टप्प्याचे काम रविवारी पूर्ण झाले. एमआयडीसी, अंधेरी स्थानकाजवळ वैनगंगा-२ या 'टनेल बोअरिंग' यंत्राने (टीबीएम) ७०६ मीटरच्या बोगद्याचे काम पूर्ण केले.

'मेट्रो-३'च्या एकूण भुयारीकरणातील हे १४ वे भुयार पूर्ण झाले आहे. या भुयारामुळे मेट्रो-३च्या सातव्या पॅकेजमधील पाच किलोमीटरचे भुयारीकरण पूर्ण झाले आहे. यानंतर 'वैनगंगा-२' हे टीबीएम सीप्झच्या दिशेने भुयारीकरणासाठी लवकरच सज्ज करण्यात येणार आहे.

संपूर्णपणे जमिनीखालून धावणाऱ्या मेट्रो-३ साठी एकूण ५२ किलोमीटर भुयारीकरण करण्यात येणार आहे. मेट्रो ३ प्रकल्पाचे काम सध्या वेगाने सुरू असून एकूण भुयारीकरणापैकी ५० टक्के भुयारीकरणाचे काम १० जूनला पूर्ण झाले आहे. भुयारीकरणासाठी सध्या १७ टीबीएम यंत्रे कार्यरत आहेत. ही यंत्रे उतरवण्यासाठी मार्गिकेवर सात ठिकाणी मोठी विवरे (लाँचिंग शाफ्ट) खोदण्यात आली आहेत. मेट्रो-३ मार्गिकेवर एकूण २७ थांबे असणार आहेत.



## भुयारीकरणाच्या कामाची प्रगती

- वैनगंगा २ या टीबीएम यंत्राचे वजन ५०० टन.
- प्रतिदिन ८.१२ मीटर इतके भुयारीकरण.
- ७०६ मीटर अंतर पूर्ण करण्यास १०९ दिवस लागले.
- पॅकेज ७ मधील एकूण ७ किमीपैकी ५.२ किमी अंतराचे भुयारीकरण पूर्ण झाले.
- मेट्रो ३ च्या एकूण भुयारीकरणापैकी ५३ टक्के भुयारीकरण पूर्ण.